

# अथक निरंतर परिश्रमाने या भूमीचा स्वर्ग करू...

## वार्षिक अहवाल : २०१६-२०१७

हर नगर ग्राम में
दीप से दीप जलाएंगे।

## राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्था

शिक्षण-संस्कार-आरोग्य-कृषी-स्वावलंबन आधारित ग्रामविकास

www.mulshigramvikas.org











आहेरवडगाव येथील डोंगर उतारावर
केलेले समतल चर



जेबा पिंपरी येथील
पांडव नाल्यातील जलसाठा



जेबा पिंपरी येथील
मांजरा नदीतील जलसाठा

## अथक निरंतर परिश्रमाने या भूमीचा स्वर्ग करू .....

मागील तीन वर्षांपासून संस्थेने विविध संस्था व व्यक्ती यांच्या आर्थिक सहाय्यातून बीड जिल्ह्यातील आहेरवडगाव, जेबा पिंपरी, कानडी बदन, दिघोळ अंबा व दीपेवडगाव या सहा गावात आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील शेलगाव अशा एकूण सात गावात जलसंधारणाची विविध कामे केली. यातील कुमशी येथे ओढ्यातील तसेच जेबा पिंपरी येथे मांजरा नदी व गावालगतच्या एका ओढ्यातील गाळ काढला. शेलगाव येथे सिमेंट बंधारे बांधले. मागील दोन वर्ष या गावांमध्ये केलेल्या जलसंधारण कामामुळे सकारात्मक परिणाम दिसू लागले. खोल गेलेल्या विहिरी व बोअरवेलच्या पातळीत वाढ झाली आहे. असा या गावांचा पाण्याचा प्रश्न सोडविला आहे. तलावाची गळती थांबविली. डोंगर उतारावर सलग समतल चर काढले. या सर्व प्रयत्नांमुळे शेतीतून शाश्वत पिकाचे उत्पन्न शेतकऱ्यांच्या पदरात पडू लागले आहे.

## केलेल्या कामाचा तपशील पुढील प्रमाणे

| क्र. | गावाचे नाव | केलेल्या जलसंधारण कामाचा तपशील | आलेला अंदाजित खर्च | झालेला पाणीसाठा (लीटर मध्ये) | ओलिताखाली आलेले क्षेत्र (हेक्टरमध्ये) | लाभार्थी शेतकरी संख्या | सहयोगी संस्था व्यक्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | शेलगाव ता.वाशी जि. उस्माना-बाद (धाराशिव) | सिमेंट बांध -२, जुन्या सिमेंट बांधाची दुरुस्ती -१ ग्याबीयन बंधारे- २ | २०,००००० | २,३५,००००० (२ कोटी ३५ लाख ली.) | ११० | ८० | केपीआयटी, मुळशी वारकरी मंडळ, भरवीरकर परिवार, हॅलीबर्टन अभियंता समुह |
| २) | कुमशी ता.बीड | ओढयातील गाळ काढणे | ५०,००० | ७,००००० (७ लाख ली.) | ५ | ४ | मराठवाडा मित्रपरिवार मुंबई |
| ३) | जेबा पिंपरी ता.जि.बीड | मांजरा नदी व अन्य ओढ्यातील गाळ काढणे | १२,००००० | १०,३५,००००० (१० कोटी ३५ लाख ली.) | ८० | ७० | पांडव परिवार, जेबापिंप्री |
| ४) | आहेर वडगाव ता.जि.बीड | तलाव दुरुस्ती व सीसीटी | ९,५०,००० | ६३,००,००००० (त्रेसष्ट कोटी ली.) | ५० | ८० | ॲटलास कॉपको, पुणे |
| ५) | कानडी बदन ता.जि.बीड | ग्याबियन बंधारा निर्मिती- ३ | १,८०००० | १६,८०,००० (सोळा लाख ऐंशी हजार ली.) | १० | २० | मंगलाबाई भागवत फौंडेशन, मुंबई |
| ६) | दिघोळ अंबा ता.जि.बीड | ग्याबियन बंधारा निर्मिती- २ | १,६०,००० | ३०,००००० (तीस लाख ली.) | १० | २० | मंगलाबाई भागवत फौंडेशन, मुंबई |
| ७) | दिपेवडगाव ता.जि.बीड | - | ३,५०,००० | ६२,५०,००० (बासष्ट लाख पन्नास हजार ली.) | ३० | ४० | मंगलाबाई भागवत फौंडेशन, मुंबई |
| | **एकूण** | **७ गावे** | **४८ लक्ष ९० हजार रुपये** | **७६,८६,३०,००० (श्याहत्तर कोटी श्यायशीं लाख तीस हजार ली.)** | **२९५ हेक्टर** | **३१४ शेतकरी** | **२ कंपन्या, व ४ सामाजिक संस्था १ परिवार** |

वरील जलसंधारण कामांबरोबरच संस्थेने शाळा, महविद्यालयामध्ये जाऊन तज्ञ व्यक्तींच्या माध्यमाने चर्चासत्र, व्याख्याने, स्पर्धांचे आयोजन केले. जलव्यवस्थापन व कमी खर्चाची गोधारीत शेती या विषयाच्या बाबतीत जागृती करण्याचा प्रयत्न केला. तसेच २०१३ मध्ये एकूण सहा जिल्ह्यात मराठवाडा मित्र परिवार मुंबई व सारस्वत बँक मुंबई यांच्या आर्थिक सहकार्याने सुमारे १ कोटी रुपयांच्या २ हजार लीटर क्षमतेच्या सुमारे ४५० पाण्याच्या टाक्या वितरीत करण्यात आल्या.

## सन २०१६ मध्ये उस्मानाबाद (धाराशिव) जिल्ह्यात तालुकाशः झालेले शेती प्रयोग

| तालुक्याचे नाव | गावांची संख्या | शेतकरी संख्या | केलेल्या प्रयोगाचा तपशील | एकूण क्षेत्र | उत्पन्नात झालेली वाढ (% मध्ये ) |
|---|---|---|---|---|---|
| उस्मानाबाद | ८ | २७ | जीवामृत, गोमुत्र फवारणी | २७ | २५ ते ५० % |
| उमरगा | २४ | ६१ | जीवामृत, गोमुत्र फवारणी | ६१ | २५ ते ५० % |
| लोहारा | ९ | २१ | जीवामृत, गोमुत्र फवारणी | २१ | २५ ते ५० % |
| तुळजापूर | १३ | ४० | जीवामृत, गोमुत्र फवारणी | ४० | २५ ते ५० % |
| परांडा | ५ | ०७ | जीवामृत, गोमुत्र फवारणी, संजीवनी अर्क | २० | २५ ते ५० % |
| भूम | ५ | ०३ | जीवामृत, गोमुत्र फवारणी | १५ | २५ ते ५० % |
| कळंब | २ | ०२ | जीवामृत, गोमुत्र फवारणी | ०४ | २५ ते ५० % |
| वाशी | ५ | ०७ | जीवामृत, गोमुत्र फवारणी | २० | २५ ते ५० % |
| **एकूण ८ तालुके** | **७१** | **१६८** | **-** | **२०८ एकर** | **-** |

तालुकाशः गावे निश्चित करून संबधित गावात किमान पाच-पाच शेतकऱ्यांचा गट करून संपर्कातील शेतकऱ्यांना पिक फवारणीसाठी नियमित गोमुत्र फवारणी व खत म्हणून जीवामृताचा वापर करण्याचा आग्रह केला. यापैकी काही शेतकऱ्यांनी गोमुत्र फवारणी, जीवामृताचा वापर या प्रयोगाबरोबरच संजीवनीअर्क, दशपर्णीअर्क यांचा वापर करून रासायनिक खते व कीटकनाशके यावर होणारा खर्च कमी केला व आपल्या उत्पनात वाढ केली.

उस्मानाबाद (धाराशीव) जिल्ह्यातील आठही तालुक्यातील अनेक गावांमधील शेतकऱ्यांनी सातत्यपूर्ण विशेष प्रयत्न करून डाळींब, द्राक्ष, ऊस, ज्वारी, गहू, भाजीपाला अशा विविध पिकांवर प्रयोग करून आपल्या उत्पादनात कमालीची वाढ केली. गोआधारित शेती कमी खर्चाची शेती ही संकल्पना आता अनेक शेतकऱ्यांना पटू लागल्याने प्रत्यक्ष प्रयोग करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढते आहे. प्रत्येक तालुक्याचा एक स्वतंत्र असा प्रयोगशील शेतकरी गट व सर्व तालुक्यांचा मिळून अशा निवडक शेतकऱ्यांचा गट तयार होत आहेत. ५ तालुक्यांच्या समित्या तयार झाल्या आहेत. या सर्व कामांचे संचालन व्यवस्थित व्हावे याकरिता १५-१६ जणांची स्थानिक जिल्हा समिती तयार करण्यात आली आहे.

**पुढील वर्षाचा संकल्प**

१) उस्मानाबाद (धाराशीव) जिल्ह्यात ८० गावांमधून प्रत्येकी ५ याप्रमाणे ४०० शेतकऱ्यांच्या शेतात गोआधारित शेतीचे प्रयोग करणे.

२) उपलब्ध झालेला सेंद्रिय शेती माल योग्य भावात विक्री व्हावा याकरिता स्थानिक बाजारपेठ व शहरांमध्ये व्यवस्था निर्माण करणे.

३) सेंद्रिय शेती, जलसंधारण व अन्य शेती संबधीच्या योजना योग्य लाभधारकांना मिळवून देण्यासाठी सहाय्य करणे.

४) उस्मानाबाद (धाराशीव) जिल्ह्यातील सेंद्रिय शेतीमाल उत्पादित करणाऱ्या निवडक व प्रयोगशील अशा शेतकऱ्यांची शासनमान्य शेतकरी कंपनी स्थापन करणे.

५) बीड व उस्मानाबाद (धाराशीव) जिल्ह्यातील गावांमध्ये जलसंधारणाची नियोजित कामे पूर्ण करणे.

## मुळशी तालुक्यातील कृषी विभाग

यावर्षी १३ गावातून २२० शेतकऱ्यांनी चतुःसुत्री भात पद्धतीने लागवड केली. त्यांच्या उत्पन्नात २०-२५ टक्के वाढ दिसून आली. पावटा या पिकाच्या बियाणावर ५० शेतकऱ्यांनी प्रक्रिया केली. त्यामुळे पावसाचा ताण आल्यावरही चांगले पीक मिळाले. १० शेतकऱ्यांनी २०० फळझाडे लावली त्यासाठी जीवामृताचा उपयोग केला. ३ शेतकऱ्यांनी ठिबकसिंचन बसवले आहे.

## बाल विद्या मंदिर



भैरवनाथ नगर पिरंगुट येथे सुरु असलेल्या बालवाडीत लहान ,मधला व मोठ्या गटात मिळून एकूण ३० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता वर्षभरात दिंडी, स्वातंत्र्यदिन, रक्षाबंधन, गणेश उत्सव, भोंडला, मकरसंक्रमण उत्सव, स्नेहसंमेलन अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या बालवाडीमुळे भैरवनाथ नगर परीसरातील गरजू विद्यार्थ्यांची उत्तम सोय होत असल्याने पालक समाधान व्यक्त करीत आहेत.



## स्वामी विवेकानंद विद्यालय, आसदे



वन भोजन



आयबीटीतील वस्तूंचे प्रदर्शन व विक्री

शाळेच्या नविन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले. यामध्ये सहा खोल्या व प्रशस्त सभागृह आहे. यावर्षी शाळेचा पट २१६ होता. त्यात १०५ मुली व १११ मुले होती. मार्च २०१७, १० वी चा निकाल १०० टक्के लागला. ३८ विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली.

प्रथम - मनोहर लवार्डे ९३.४० टक्के, द्वितीय - निखिल धोंडिबा चव्हाण - ९१.८०, तृतीय - नारायण हरिभाऊ उक्कलकर - ९१.२५ टक्के. विशेष प्राविण्य १६, प्रथम श्रेणी १५ व व्दितीय श्रेणी ६ असा निकाल लागला.

**आंतरशालेय स्पर्धेतील सहभाग व यश -** तालुकास्तरावरील कबड्डीमध्ये मुले व मुली प्रथम आल्या. मैदानी स्पर्धेत ३० वैयक्तिक बक्षिसे मिळाली. पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघ अमृत महोत्सवानिमित्त समुहगीत स्पर्धा झाली त्यात प्रथम पारितोषिक मिळाले. रोटरी क्लब शनिवारवाडा कडून हॅपी स्कूलसाठी निवड.

**स्पर्धा परिक्षा-** ५ वी / ८ वी शिष्यवृत्ती परिक्षा, राष्ट्रीय प्रज्ञाशोध, नॅशनल मिन्स कम मेरिट परिक्षा विद्यार्थ्यांनी दिल्या. तसेच चित्रकलेच्या एलीमेटरी व इंटरमिजिएट परिक्षा दिल्या.

**अभ्यासेतर कार्यक्रम -**आषाढी एकादशीची दिंडी, शिक्षकदिन, भोंडला, शरद मल्हार महोत्सव, स्नेह संमेलन, स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त विवेकानंद पुतळ्याला भेट व वनभोजन, स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यतिथी, १० वीच्या विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा समारंभ. शाळेच्या स्काऊट, गाईड पथकाची नोंदणी केली व स्काऊट, गाईडच्या जिल्हा मेळाव्यात भाग घेतला.

**इतर संस्थांचा सहभाग -** १) समवेदनाकडून विद्यार्थ्यांचा आरोग्य तपासणी व समुपदेशन २) रोटरी क्लब कर्वेनगर कडून ग्रंथालयासाठी कपाट व १८० पुस्तके. ३) रोटरी क्लब पुणे जिल्ह्याकडून प्रयोगशाळा साहित्य. ४) महिंद्रा कंपनीकडून एलसीडी प्रोजक्टर. ५) मावळा प्रतिष्ठानकडून ई लर्निंग सेट व प्रोजक्टर. ६) एम डी देशपांडे यांच्या सहकाऱ्यांकडून १० खुर्च्या. ७) मगनमल उधाराम कॉलेज ऑफ कॉमर्सच्या, पिंपरी माजी विद्यार्थ्यांकडून १२ सायकली मिळाल्या.

## मूलभूत तंत्रज्ञानाची ओळख (Introduction to Basic Technology)



२००६ पासून स्वामी विवेकानंद विद्यालयात हा अभ्याक्रम सुरु केला आहे. त्यामुळे विद्यार्थांचा तांत्रिक शिक्षणाकडे कल वाढला आहे.

त्यामुळे ५ विद्यार्थ्यांनी आयटीआयला प्रवेश घेतला. एका विद्यार्थीनीने विज्ञान आश्रमात प्रवेश घेतला. यावर्षी आपण खालील अभ्यासक्रम पूर्ण केला.

**उर्जा पर्यावरण -** विद्युत उपकरणे दुरुस्ती, बल्बच्या माळा बनविणे, सोलर कुकरवर अन्न बनविणे.

**अभियांत्रिकी -** पोळपाट,पाट बनविले. रोप लावणी यंत्र व बाकांची दुरुस्ती केली.

**शेती, पशुपालन -** माती परिक्षण, पंपाने किडनियंत्रक फवारणी, बीज प्रक्रिया, बियाणे निर्मिती, वांगी व काकडी लावणे.



**तुषार सिंचन पद्धतीची उभारणी व प्रात्यक्षिक**

**गृह आणि आरोग्य -** रक्त गट व हिमोग्लोबिन तपासणी, वडापाव, नानकटाई, चकली, शेव, खारे दाणे व शंकरपाळे बनविणे.

**विद्यार्थीनी वसतीगृह -** वसतीगृहाला यावर्षी १० वर्षे पूर्ण झाली. दोनच विद्यार्थीनींना उच्च व व्यावसायिक शिक्षणासाठी उद्युक्त करु शकलो. या दोघींनी दहावी नंतर ५ वर्षे शिक्षण घेऊन (General Nursing & Midwifery) पूर्ण केले. निकिता कोकरेला ८४ टक्के व अनिता कोकरेला ७८ टक्के मिळाले. त्यांच्या महाविद्यालयातून निकिता पहिली व अनिता तिसरी आली. आता आपल्याकडे मुलींची संख्या वाढू लागली आहे. मागील वर्षी २५ मुलींनी प्रवेश मागितला. म्हणून आपण निकिता कदम व अनिता ढेबे या दोघींना महर्षि कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत प्रवेश घेऊन शिकविले. यावर्षी पाचवीच्या ३, सहावीच्या ३, सातवीच्या ६, आठवीच्या ८, नववीच्या ३ व दहावीच्या २ अशी एकूण मुलींची संख्या २५ आहे. दहावीतील विद्या शिंदेला ७८.४० व अनिषा ढेबेला ६० टक्के मिळाले. दोघींनी व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला.

**विद्यार्थी वसतीगृह -** वसतीगृहाला यावर्षी १५ वर्षे झाली. यावर्षी ८ विद्यार्थी होते. अनेक विद्यार्थी व्यवसायात स्थिर होताना दिसत आहेत. ते व्यवसायाबरोबर संस्थेच्या कामातही मदत करत आहेत. यावर्षी पाचवीत १, सहावीत ३, सातवीत १, आठवीत १, सहावीत ३, सातवीत व आठवीत १, नववीत २ अशी संख्या होती.

## हिम्मत शाळा

संस्थेच्या हिम्मत शाळेचे हे पाचवे वर्ष. यावर्षी एकूण २९ विद्यार्थांनी प्रवेश घेतला. २४ विद्यार्थी शाळेत नियमित उपस्थित राहिले. २३ विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली. ७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांच्या परिक्षा केंद्राने तोंडी परिक्षेचे गुण पाठविले नाहीत. म्हणून निकाल खराब लागला. विद्यार्थ्याना शालेय अभ्यासाबरोबरच ''पुणे विद्यार्थी गृहाच्या'' महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था पुणे यांच्या माध्यमाने 'मूलभूत वीजतंत्री तंत्रज्ञानाची ओळख' व 'आधुनिक शेती' हे दोन व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविले. विद्यार्थ्यांनी तालुक्यातील गोशाळा, कृषी पर्यटन केंद्र, तालुका कृषी कार्यालय, इनोरा यांना अभ्यास भेटी दिल्या. अनेक विद्यार्थी पुढील शिक्षण घेत घेत नोकरी व व्यवसायात स्थिर होत आहेत. जी युवा शक्ती ९ वी नापासाचा शिक्का घेऊन वाया जाणार होती ती कारणी लागण्यास सुरु झाले आहे. यातून अनेक यशस्वी उदाहरणे दिसू लागली आहेत.



**इनोरा संस्थेतील गांडुळ खत प्रकल्पाला हिम्मत शाळेची भेट**

२०११-१२ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी विक्रांत निकटे, शंकर शेळगे व सोमनाथ मुजुमले यांनी हिम्मत शाळेत मोबाईल दुरुस्तीचे प्रशिक्षण घेतले. विक्रांत व शंकरने घोटावडे फाटा येथे तर सोमनाथने पिरंगुट कँप येथे मोबाईल दुरुस्तीचे दुकान सुरु केले आहे. २०१३-१४ मधील विद्यार्थी अनिकेत शितोळे याने आधुनिक शेती व कुकुटपालन करत आहे. २०१४-१५ मधील विद्यार्थी आनंद खैरे याने घोटावडे फाटा व पिरंगुट येथे स्वतःचा दुग्ध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीचा व्यवसाय सुरु केला आहे.




**हिम्मत शाळेचा माजी विद्यार्थी**
**आनंद खैरे याने सुरु केलेला दुध व्यवसाय**

## महिला विभाग

आपण २६ गावातून ६० बचतगट चालवितो. काही बचत गटांची पुनरर्चना करून व नवे सभासद जोडून माले व भूगाव येथे १०० महिलांचे २ मोठे बचतगट तयार केले. याने गावात एकी व्हायला सुरुवात झाली. याचा महिलांना सामुदायिक उद्योग करण्यास फायदा होईल. यातील १८ गटांना बँकेकडून एकूण ९८ लाखापर्यंत कर्ज मिळवून देण्यात आले. त्यातून महिलांनी मिरची कांडप, शेवया बनविणे, पिठगिरणी, शिवणकाम असे विविध उद्योग सुरु केले. २५ महिलांना ५ हजार शबनम पिशव्या बनविण्याचे कंत्राट मिळवून दिले. जागतिक महिला दिनानिमित्त पंचायत समितीने जत्रा भरविली होती. त्यात चार गाळ्यांमधून दोन दिवस बचतगटांनी बनविलेल्या वस्तूंची विक्री केली. सेवा सहयोगने शैलेश सभागृहात भरविलेल्या प्रदर्शनात व भीमथडी जत्रेत गाळे घेऊन वस्तू विक्री केली.

यावर्षी १८ महिलांचा शिवणकला व ६ महिलांचा ब्यूटीपार्लरचा वर्ग घेतला. महिलांना मसाले, पापड व केक बनविण्याचे प्रशिक्षण दिले. गावागावात सरकारने नेमलेल्या 'आशाताईंना' बचतगटांमध्ये बोलावून त्यांचे आरोग्य विषयक मार्गदर्शन घेतले.

हिवरे बाजार, राळेगंण सिद्धीला महिलांची सहल नेण्यात आली. अण्णांचे मार्गदर्शन महिलांना मिळाले. शासकीय योजनेत परिसर व मंदिर स्वच्छता, ग्रामरक्षक दल व आरोग्य दल स्थापनेत आपल्या महिला संघटिकेचा चांगला सहभाग राहिला.

अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी, सावित्रीबाई फुले जयंती, हळदी कुंकू व जागतिक महिला दिन असे कार्यक्रम घेतले. सावित्रीबाई फुले जयंतीच्या दिवशी ५२० महिलांचा सहभाग होता. यासाठी माले येथील सेनापती बापट विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मालतीताई दातीर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमांमधून महिलांनी विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम केले. महिलांच्या स्पर्धा घेतल्या.



**महिला बचत गट**
**मासिक बैठक**



पौड येथील कातकरी वस्तीलगत वन जमिनीवर वृक्षारोपण



डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त धावणे स्पर्धा



श्रीराम इको रक्षा कॉम्पुटर कंपनी प्रतिनिधींची सदिच्छा भेट



रोटरी क्लब तर्फे ग्रंथ भेट

## अन्य उपक्रम

१) संस्थेच्या माध्यमाने तालुक्यातील विविध कातकरी वस्त्यावर संपर्क करून आदिवासी बांधवांच्या विकासाकरिता विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. पौड येथील कातकरी वस्ती लगत असलेल्या वनविभागाच्या दीड एकर जमिनीवर अविनाश शिंदे व परिवार यांच्या सहकार्याने २७ प्रकारच्या फळझाडांची लागवड करून त्याची वर्षभर निगा राखण्यात आली.

२) शनिवारवाडा रोटरी क्लब, हेरीटेज रोटरी यांच्या वतीने सुतारवाडी, शिळेश्वर याठिकाणी निवासी विद्यार्थी शिबिरे घेण्यात आली.

३) श्री शिवसमर्थ बचत गटाचा मागील पाच वर्षाचा आर्थिक हिशोब पूर्ण करून नव्याने ६० सदस्यांचा गट स्थापन करण्यात आला. या गटाच्या माध्यमाने भीमाशंकर येथे सहल, आंबेडकर जयंती निमित घोटावडे फाटा ते उरावडे सायकल स्पर्धा, वाघवाडी येथे तालुकास्तरीय जोरस्पर्धा, कुटुंब मेळावा आदी कार्यक्रम घेण्यात आले.

४) केपीआयटी कंपनीच्या सहकार्याने मुळशी तालुक्यातील चार माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना बालवैज्ञानिक स्पर्धेत सहभागी करण्यात आले.

५) संस्थेच्या विवेकानंद स्पर्धा परीक्षा केंद्राच्या ग्रंथालय व अभ्यासिकेचा १८ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. यापैकी किरण घोरपडे या विद्यार्थ्याची महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री फेलोशिपसाठी निवड झाली.

६) दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भरे येथील आबासाहेब शेळके मित्रमंडळाच्या वतीने आयोजित तालुका स्तरीय आदर्श गणेश मंडळ स्पर्धेचे परीक्षण संस्थेच्या कार्यकर्त्यांनी करून दिले.यावेळी ४० गावांमधील ७३ मंडळांचे परिक्षण करण्यात आले.

७) धाराशीव जिल्ह्यातील दोन गरजू विद्यार्थांना शैक्षणिक शुल्कासाठी विवेकानंद प्रतिष्ठानकडून प्रत्येकी १० हजार रुपयांची आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यात आली.

८) पुणे येथील गोविज्ञान संशोधन संस्था व कमिन्स कंपनी यांच्या सहकार्याने गणपती उत्सवात जमा करण्यात आलेल्या निर्माल्याचे कंपोस्ट खत तयार करून तालुक्यातील ३० शेतकऱ्यांना वितरण करण्यात आले.

९) श्रीराम इको रक्षा कॉम्पुटर सर्व्हिसेस कर्नाटक या संस्थेकडून वीस संगणक संच मिळाले.

१०) सेवा वर्धिनी व ॲटलास कॉपको पुणे यांनी आयोजित केलेल्या जलदूत प्रशिक्षण कार्यक्रमात संस्थेच्या दोन कार्यकर्त्यांना शेती व पाणी विषयाचे प्रशिक्षण मिळाले.

**आवाहन - संस्थेसाठी आपण देणगी देऊन व कार्यकर्ता म्हणून सहभागी होऊ शकता. संस्थेला ८० जी सवलत उपलब्ध आहे. धनादेश 'राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्था' ('Rashtriya Sarvangin Gramvikas Sanstha') या नावाने देऊ शकता.**


राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्था

गट क्र. २९७, प्लॉट क्र. २२ अ, दत्त मंदिराजवळ, अंबडवेट, ता. मुळशी, जि. पुणे ४१२ १०८. (भारत)

भ्रमणध्वनी : . ईमेल : mail4rsgs@gmail.com **www.mulshigramvikas.org**

संपर्क : अनिल व्यास ८८८८८७१३१०, सौ. पूनम मेहता ९४२२० ८८६८४, रवींद्र देव ९८२२० ९८०५३, प्रदीप पाटील ७३८७५ ४३४७८